
# ऑक्टोबर ते डिसेंबर २०१७ दरम्यान पिकांच्या संभाव्य किंमतींचा अहवाल




मे २०१७






**भारतीय कृषि विपणन माहिती व विश्लेषण केंद्र**

**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प**

प्लॉट एफ/इ/७८, पहिला मजला, भूविकास बँक इमारत,
मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७.
फोन : ०२० २४२७०३१५, वेबसाईट : http://macp.gov.in

दि.२९/०५/२०१७

## सोयाबीनच्या संभाव्य किंमती - ऑक्टोबर ते डिसेंबर २०१७

सोयाबीन हे आंतराष्ट्रीय स्तरावरील अतिशय महत्वाचे पीक आहे. सोयाबीनच्या किंमतीवर फक्त भारतातील नव्हे तर जगातील उत्पादन व उपभोग करणाऱ्या देशातील मागणी व पुरवठा याचा परिणाम होतो. अमेरिका, ब्राझील, अँजेटिना, चीन व भारत या प्रमुख सोयाबीन उत्पादन करणाऱ्या देशातील उत्पादनात वाढ झाल्यामुळे सन २०१६ - १७ या वर्षात जागतिक सोयाबीन उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत ११.९८% ने वाढ झाली आहे. भारत सरकार कृषि मंत्रालयाच्या, सन २०१६-१७ या वर्षासाठीच्या तिसऱ्या आगाऊ अंदाज अहवालानुसार, सोयाबीनचे उत्पादन १४.०२ दशलक्ष टन होईल असा अंदाज आहे. मागील वर्षी (२०१५ -१६) मध्ये ८.५ दशलक्ष टन उत्पादन झाले होते.

फेब्रुवारी ते एप्रिल २०१७ मध्ये इंदूर बाजारात सोयाबीनच्या किंमतीत स्थिर कल दिसुन येतो. या दरम्यान सोयाबीनच्या सरासरी किंमती रुपये ३०३६ प्रति क्विंटल होत्या. कारण सोयाबीनची बाजारात अधिक उपलब्धता व प्रक्रिया उद्योगाकडुन असणारी मागणी कमी यामुळे किंमती स्थिर राहील्याचे दिसुन येते.

सन २०१६-१७ या हंगामासाठी सोयाबीनची किमानआधारभूत किंमत (MSP) रु. २७७५/- प्रती क्विंटल होती. सन २०१७ - १८ च्या खरीप हंगामासाठीच्या किमान आधारभूत किंमती जाहीर व्हायच्या आहेत. USDA च्या WASDE अहवालानुसार (मे २०१७) सन २०१७-१८ मध्ये भारतात सोयाबीनचे उत्पादन ११.५० दशलक्ष टन होण्याची शक्यता वर्तविली आहे. मागील दोन वर्षामधील इंदूर बाजारातील सोयाबीनच्या ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

| वर्ष | किंमतीरु. (प्रति क्विंटल) |
|---|---|
| २०१५ | ३७६५ |
| २०१६ | ३०५७ |

दि. २३ मे २०१७ रोजीच्या इंदूर बाजारातील सोयाबीनच्या फ्युचर्स किंमती खालील प्रमाणे.

| महिना | किंमतीरु. (प्रति क्विंटल) |
|---|---|
| जुन २०१७ | २७८२ |
| जुलै २०१७ | २८५० |
| ऑगस्ट २०१७ | २९०९ |
| ऑक्टोबर २०१७ | २९६१ |
| नोव्हेंबर २०१७ | ३०१३ |
| डिसेंबर २०१७ | ३०६५ |

मागील काही वर्षातील किंमतीचे अर्थमिती विश्लेषण, बाजारातील सद्यस्थिती व सरासरी पाऊस आल्यास सन २०१७ मध्ये इंदूर बाजारात ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात सोयाबीनच्या संभाव्य सरासरी किंमती या दरम्यान राहतील असे अपेक्षित आहे. सुधारीत अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल. पुढील अंदाज अहवाल जुन २०१७ मध्ये प्रकाशित केला जाईल.

* * * * *

दि.२९/०५/२०१७

## कांद्याचा संभाव्य किंमती - ऑक्टोबर ते डिसेंबर २०१७

कांदा हे अतिशय महत्वाचे व्यावसायिक भाजीपाला पिक आहे. कांदा अतिशय नाशवंत असल्यामुळे किंमतीं मध्ये खुप अस्थिरता जाणवते. तसेच माहे मार्च ते मे २०१७ च्या दरम्यान लासलगाव बाजारीतील कांद्याच्या सरासरी किंमती रु.५०० प्रति क्विंटल होत्या.

FAO (२०१४) च्या आकडेवारीनुसार जागतिक कांदा उत्पादनात चीन नंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. तसेच एकुण जागतिक कांदा उत्पादनात २०% वाटा भारताचा आहे. भारतात महाराष्ट्र (२८%), हे प्रमुख कांदा उत्पादक राज्य असुन त्या नंतर कर्नाटक (१७%) व मध्य प्रदेश (१५%) या राज्याचा क्रमांक लागतो.

राष्ट्रीय अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च परिषद(एन.सी.ए.इ.आर,रब्बी आउटलुक रिर्पाट मार्च २०१७) नुसार वर्ष २०१६-१७ मध्ये २२.५ दशलक्ष टन कांदा उत्पादनाचा अंदाज आहे, व जे मागील २०१५ -१६ तील उत्पादनाच्या (२०.९९ दशलक्ष टन) च्या तुलनेत ७.२%जास्त आहे. भारतातून कांद्याची निर्यात मुख्यतः बांग्लादेश, मलेशिया, संयुक्त अरब अमिरात व श्रीलंका या देशामध्ये केली जाते.

सी.एम.आय.ई च्या सन २०१६ - १७ च्या अंदाजानुसार भारतातील कांद्याचे क्षेत्र ११.८३ लाख हेक्टर आहे. तसेच ते मागील वर्षी १३.२० लाख हेक्टर होते.

तसेच जास्त रब्बी कांदा उत्पादनाच्या अंदाजामुळे सरकारने किमान निर्यात मुल्य हटविले आहे. नाशिक, पुणे, सातारा, जळगांव, धुळे, अहमदनगर, नागपूर व सोलापूरही महाराष्ट्रातील प्रमुख कांदा उत्पादक जिल्हे आहेत.

मागील दोन वर्षात माहे ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान लासलगांव बाजारातील कांद्याच्या सरासरी किंमती खालील प्रमाणे होत्या

| वर्ष | सरासरीकिंमती (रु/क्विटंल) |
|---|---|
| २०१५ | १२६० |
| २०१६ | ७९१ |

मागील १२ वर्षांतील कांद्याच्या किंमतींच्या विश्लेषण व बाजारातील सध्यस्थिती वरुन, सन २०१७ च्या ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यातील लासलगांव बाजारातील कांद्याच्या संभाव्य सरासरी किंमती **रु. ४०० ते रु. ६०० प्रति क्विंटल** या दरम्यान राहतील असे अपेक्षित आहे. सुधारीत अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल. पुढील अंदाज अहवाल माहे जून २०१७ अखेर केला जाईल.

* * * * *

दि.२९/०५/२०१७

## मक्याच्या संभाव्य किंमती - ऑक्टोबर ते डिसेंबर २०१७

सन २०१६ - १७ मध्ये जागतिक मका उत्पादनात भारताचा वाटा २.६% होता. देशात मका पिकाचे ७३% उत्पादन खरीप हंगामात होते. व उर्वरीत रब्बी हंगामात होते. मक्याच्या किंमती वर गुणवत्ता, आर्द्रता, पुरवठा व मागणी याचा परिणाम होतो. एप्रिल व मे २०१७ या महिन्यामध्ये निझामाबाद या बाजारातील मक्याची सरासरी किंमत रु. १,४६०/- प्रति क्विंटल इतकी त्याचबरोबर मक्याच्या वायदे बाजारातील सध्याच्या किंमती वाढता कल दर्शवित राहीली आहेत.

USDA अहवालानुसार वर्ष २०१६-१७ मध्ये देखील उत्पादन २६.१५ मिलीयन टन इतके उत्पादन झालेले आहे. तसेच भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार देखील उत्पादन २६.१५ मिलियन टन इतकेच आहे.

सन २०१६ - १७ हंगामासाठी मक्याची किमान आधारभुत किंमत रु. १३६५ प्रति क्विंटल इतकी होती. सन २०१७- १८ हंगामासाठी किमान आधारभुत किमंत सरकार द्वारे अजुम निश्चीत करण्यात आलेली नाही.

मागील दोन वर्षातील मक्याच्या निझामाबाद बाजारातील मक्याच्या ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यात सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

| **वर्ष** | **किंमती(रु. प्रति क्विंटल)** |
|---|---|
| २०१५ | १२९६/- |
| २०१६ | १४९६/- |

२५ मे २०१७ रोजी वायदे बाजारातील मक्याच्या किंमती पुढील प्रमाणे.

| **महिना** | **किंमती(रु. प्रति क्विंटल)** |
|---|---|
| जुन २०१७ | १४४५ |
| जूलै २०१७ | १४७२ |
| ऑगस्ट २०१७ | १५४५ |

मागील १२ वर्षातील मक्याच्या बाजार भावाच्या किंमतीचे अर्थमिती विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती वरुन, सन २०१७ मध्ये ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यात मक्याच्या संभाव्य सरासरी किंमती **रु. १४०० ते रु. १६०० प्रति क्विंटल** या दरम्यान राहतील. पुढील अंदाज अहवाल जुन २०१७ अखेर प्रकाशित केला जाईल.

* * * * *

दि.२९/०५/२०१७

## तूरीच्या संभाव्य किंमती - ऑक्टोबर ते डिसेंबर २०१७

भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. अकोला बाजारपेठेतील तूरीच्या सरासरी किंमती रु. ४२००/- रु. ते ३८००/- प्रति क्विंटल इतक्या कमी होताना दिसतात. भारत सरकार कृषि मंत्रालयाने प्रकाशीत केलेल्या अहवालानुसार तुरीचे उत्पादन साधारणपणे ४६ लक्ष टन इतके आहे. मागील वर्षी ते २४.६० लक्ष टन इतके होते.

चालु वर्ष २०१६ मधील लक्षणीय उत्पादन विचारात घेता तुरीच्या किंमती किमान आधारभूत किंमत रु ५०५० पेक्षा कमी झालेल्या आहेत. सध्य परिस्थितीत शेतकरी, FPOs आणि बाजार समिती कर्मचारी इत्यादीच्या मते तुरीच्या किमती किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी राहण्याची शक्यता वर्तविली आहे. तुरीच्या बाजारपेठेवर मागील वर्षातील तुर साठा, आयात तसेच मोठ्या प्रमाणावरील उत्पादन यांचा परिणाम असलेला दिसतो. वर्ष २०१६ -१७ साठी तुरीची किमान आधारभुत किमंत ही रु. ५०५०/- प्रति क्विटंल इतकी आहे. पुढील तक्यामध्ये दि.२२ एप्रिल २०१७ पर्यंत देशभरात खरेदी केंद्रामार्फत खरेदी केलेले तुरीचे प्रमाण दर्शविले आहे.

| संस्था | तुर खरेदी उद्दीष्टे (MT) | तुर खरेदी दि. ७ मार्च(MT) | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| NAFED | ४,२०,००० | ९,१९,६६७ | २९१ |
| FCI | ९०,००० | १,७५,२९७ | १९५ |
| SFAC/FPO | ९०,००० | ७१,०७८ | ७९ |
| एकुण | ६,००,००० | ११,६६,०४३ | १९४ |

तुर खरेदीचे राष्ट्रीय उदिष्टे ६लाख मे. टन असुन आतापर्यंत उद्दीष्टा पेक्षा ९४% जास्त तुर खरेदी झालेली आहे.

मागील दोन वर्षातील तूरीची अकोला बाजारपेठेतील (ऑक्टोबर ते डिसेंबर) दरम्यानच्या तुरीच्या सरासरी किंमती पुढीलप्रमाणे :

| वर्ष | किंमत (रु. प्रति क्विंटल) |
|---|---|
| २०१५ | ९४९१/- |
| २०१६ | ५५५८/- |

सध्यस्थितीनुसार बाजारातील परिस्थिती विचारात घेता, अकोला बाजारपेठेतील ऑक्टोबर ते डिसेंबर २०१७ दरम्यान तुरीच्या किंमतीमध्ये वाढ होण्याची शक्यता नाही. पुढील सुधारीत किंमत अहवाल जुन २०१७ मध्ये प्रकाशित करण्यात येईल.

* * * * *

दि.२९/०५/२०१७

## टोमॅटोच्या संभाव्य किंमती - जुन ते जुलै २०१७

टोमॅटो हे अतिशय महत्वाचे व्यावसायिक व आहारातील भाजीपाला पिक आहे. व्यावसायिक दृष्ट्या टोमॅटो हे कमी कालावधीचे, जास्त उत्पन्न मिळवून देणारे व किफायतशीर आहे, त्याचबरोबर ते अत्यंत नाशवंत पिक आहे. मार्च ते मे २०१७ दरम्यान पुणे बाजारात टोमॅटोच्या सरासरी किंमती रुपये १००० प्रति क्विंटल होत्या.

FAO (२०१४) च्या आकडेवारी नुसार, जागतिक टोमॅटो उत्पादनात चीन नंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. तसेच एकुण जागतिक टोमॅटो उत्पादनात भारताचा ८% वाटा आहे. राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या सन २०१४-१५ च्या आकडेवारीनुसार, (भारतात महाराष्ट्र राज्य हे टोमॅटो उत्पादनात दहाव्या क्रमांकावर आहे. त्यानंतर मध्यप्रदेश, (१३%), कर्नाटक (१२%), आंध्र प्रदेश (९%), ओडिसा (८.४%) व गुजरात (७.७%) या राज्याचा क्रमांक लागतो.) नाशिक, पुणे, सातारा, अहमदनगर, नागपूर व सांगली ही महाराष्ट्रातील प्रमुख टोमॅटो उत्पादक जिल्हे आहेत.

राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या सन २०१५-१६ च्या तृतीय अंदाजानुसार भारतातील टोमॅटोचे क्षेत्र व उत्पादन अनुक्रमे सुमारे ७.६ लाख हेक्टर व १८.४ दशलक्ष टन होते. तर सन २०१४ -१५ करिता ते अनुक्रमे सुमारे ७.७ लाख हेक्टर व १६.४ दशलक्ष टन होते.

मागील दोन वर्षात माहे जुन- जुलै महिन्यातील पुणे बाजारातील टोमॅटोच्या सरासरी किंमती खालीलप्रमाणे होत्या.

| वर्ष | सरासरी किंमती (रु/क्विटंल) |
|---|---|
| २०१५ | १९३० |
| २०१६ | ६३० |

मागील १२ वर्षांतील किंमतीच्या विश्लेषण, बाजार सर्वेक्षण व बाजारातील सध्यस्थिती वरुन, सन २०१७ च्या जुन - जुलै महिन्यात पुणे बाजारातील टोमॅटोच्या संभाव्य सरासरी किंमती **रु. ४०० ते रु.६०० प्रति क्विंटल** या दरम्यान राहतील, असे अपेक्षित आहे. सुधारीत अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल. पुढील अंदाज अहवाल माहे जुन २०१७ अखेर केला जाईल.

* * * * *


**अधिक माहितीसाठी कृपया संपर्क करा:**

**प्रकल्प संचालक**

**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प**

भारतीय कृषि विपणन माहिती व विश्लेषण केंद्र

प्लॉट एफ/इ/७८, पहिला मजला, भूविकास बँक इमारत,

मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७.

फोन : ०२० २४२७०३१५, वेबसाईट : http://macp.gov.in



टिप : सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमत विषयक अनुमान दर्शवितो. स्थानिक व आंतरराष्ट्रीय पातळीवर नैसर्गिक तसेच आर्थिक घटकांमुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. वाचकांनी सदर अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा, अन्यथा होणा-या नुकसानीस MACP प्रकल्प जबाबदार राहणार नाही.